# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com


## अमरावती जिल्ह्यातील युवकाची नांदुऱ्यात मालगाडी खाली आत्महत्या

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**- रेल्वे स्थानकाजवळ एका १८ वर्षीय तरुणाने धावत्या मालगाडीसमोर उडी घेत आत्महत्या केल्याची घटना बुधवार, २५ जून रोजी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार, अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव बारी येथील मयुर प्रदीप तलवारे (वय १८) असे मृत तरुणाचे नाव आहे. दुपारी सव्वा दोनच्या सुमारास नांदुरा रेल्वे स्थानकाजवळ एका तरुणाने अचानक मालगाडीसमोर उडी घेतल्याची माहिती लोहमार्ग पोलिसांना मिळाली. यानंतर तात्काळ पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा करण्यात आला. मृतकाच्या खिशातून सापडलेल्या ओळखपत्रावरून त्याची ओळख पटली. आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट असून, यासंदर्भात पुढील तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेने अनेक प्रश्न उपस्थित केले असून, युवकाने इतके टोकाचे पाऊल का उचलले? याचे उत्तर शोधणे गरजेचे ठरत आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीसाठी शवविच्छेदनासाठी पाठवला असून, घटनेचा सखोल तपास सुरू आहे.

# शहरात अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात

**खामगाव (का.प्र.) :** अनेक दिवसांपासून प्रस्तावित करण्यात आलेली अतिक्रमण हटाव मोहीम आज अखेर सुरू झाली आहे. न. प. प्रशासनाने अॅक्शन मोडवर येत आज शहरातील अतिक्रमणांवर बुलडोजर चालवत अनेकांची अतिक्रमणे तोडली. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात येत असून यामुळे शहरात एकच खळबळ निर्माण झाली आहे.

खामगाव नगर पालिकेच्या वतीने शहरातील अतिक्रमणधारकांना काही दिवसापूर्वीच नोटिसा देवून आपआपली अतिक्रमणे काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याच प्रमाणे शहरात ध्वनिक्षेपक फिरवून देखील अतिक्रमण धारकांना सूचना देण्यात आल्या होत्या. दरम्यान अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यासाठी नगर पालिकेच्या वतीने विशेष पथकं स्थापन करण्यात आले असून पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला होता. संपूर्ण तयारी झाल्यानंतर आज सकाळी ११



वाजे पासून शहरात प्रत्यक्ष अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करण्यात आली.

स्वतः मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांनी रस्त्यावर उतरून मोहीम राबविण्यास सुरुवात केली. नगर पालिका चौका पासून या कारवाईला प्रारंभ करण्यात आला.

तगड्या पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने अतिक्रमण तोडण्यात आले. बस स्थानक ते टॉवर चौक जलंब नाका तसेच टॉवर चौक ते पंचशील होमिओपॅथी रुग्णालय, सरकी लाईन, भुसावळ चौक या भागातील अतिक्रमण हटविण्यात आले असून वृत्त लिहेपर्यंत ही कारवाई सुरूच होती. अचानक सुरू झालेल्या या कारवाईने शहरात खळबळ उडाली आहे.

**नागरिकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घ्यावी मुख्याधिकारी**

शहरात अतिक्रमण हटवण्याची मोहीम अशीच सुरु राहणार असून ज्या व्यवसायिकांची तथा नागरिकांची अतिक्रमणे आहेत, त्यांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घ्यावी जेणे करुन नुकसान होणार नाही, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांनी केले आहे.

## शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची २९ वी सभा उत्साहात

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** कृषी विज्ञान केंद्राच्यावतीने शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची २९ वी सभा मौजे मुरादपूर येथील शेतकरी रामेश्वर इंगळे यांच्या शेतात मोठ्या उत्साहात पार पडली. सभेचे अध्यक्षस्थान विष्णूभाऊ गाडेकर यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे, कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. दिनेश कानवडे, विशेषज्ञ डॉ. नरेंद्रकुमार देशमुख, डॉ. जगदीश वाडकर, शेतकरी-शास्त्रज्ञ मंचचे अध्यक्ष विजय भुतेकर, स्वप्नील महाजन उपस्थित होते. या वेळी डॉ. अमोल झापे यांनी शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची संकल्पना व उद्दिष्ट स्पष्ट करताना, कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा प्रसार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यामागील उद्देश अधोरेखित केला. त्यांनी खरीप पिकासाठी उपयुक्त अशा कृषी निविष्ठांबाबतही माहिती दिली. डॉ. दिनेश कानवडे यांनी खरीप पीक लागवडीच्या नव्या तंत्रज्ञानांवर सखोल मार्गदर्शन करताना मका पिकाच्या व्यवस्थापनासंदर्भातही महत्वपूर्ण माहिती दिली. तर स्वप्नील महाजन यांनी 'शून्य मशागत तंत्रज्ञान' या पर्यावरणपूरक शेतीपद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले. दत्तात्रय टेकाळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना पशुधन व्यवस्थापन व दुग्धव्यवसाय यावर मार्गदर्शन केले.

सभेनंतर शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यात खरीप पिकांवरील कीड-रोग नियंत्रणाबाबत खुली चर्चा झाली. यानंतर सर्व मान्यवरांनी श्री. इंगळे यांच्या टोमॅटो लागवड प्रक्षेत्रास भेट देत प्रत्यक्ष निरीक्षण केले व इंगळे यांच्याकडून टोमॅटो लागवडीविषयी माहिती जाणून घेतली.

## बुलडाण्यातील ६६ ग्रा.प. सरपंच पदाची आरक्षण सोडत ८ जुलैला

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या १३ व १६ जून रोजीच्या अधिसूचनेनुसार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांच्या १७ जून २०२५ रोजीच्या सुधारित अधिसूचनेनुसार बुलडाणा तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतींतील सरपंच पदांचे आरक्षण सोडत ८ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा निवडणूक इमारत, तहसील कार्यालयाजवळ, चिखली रोड, बुलडाणा येथे काढण्यात येणार आहे.

या सभेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग यांसाठी सरपंच पदांचे आरक्षण सोडत काढली जाणार आहे.

यासोबतच अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, मागास प्रवर्ग महिला व खुल्या प्रवर्ग महिला यांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत काढण्यात येणार आहे. या महत्त्वाच्या प्रक्रियेस तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी, राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी केले आहे.

## पोस्टे मलकापूर शहराची कामगिरी....
## खुनाच्या गुन्हयातील आरोपी तात्काळ निष्पन करून तात्काळ अटक



मृतक तुळशीराम पठ्ठे



आरोपी मुलगा व पत्नी

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)**- २६ जून रोजी तुळशिराम पठठे यास लोखंडी सळईने मारले बाबत माहीती मिळाल्याने पोनिसा गणेश गिरी सो सोबत सपोनी कौळासे व पोस्टाफ सह सदर ठिकाणी तात्काळ जावून पाहणी केली असता इसम नामे तुळशिराम पठठे यांचे राहते घरामध्ये बाथरुममध्ये रक्तबंबाळ व जखमी अवस्थेत पडलेले असल्याचे तसेच कोणतीही हालचाल करीत नसल्याचे दिसुन आले. त्यास उपचारकामी पोलीस स्टॉफसह उपजिरु मलकापुर येथे ॲम्बुलन्सने रवाना केले व सदर घटनास्थळाचा पंचनामा करणे कामी सपोनी कौळासे यांना आदेशित केले. सपोनी कौळासे यांनी सरकारी पंच घेऊन सदर गुन्हयाचा घटनास्थळ पंचनामा केला.

पंचनामा करते वेळी घटनास्थळावरुन लोखंडी सळई व घटनास्थळावर पडलेले रक्ताचे नमुने पंचा समक्ष जप्त केले.

त्यांनतर वैदयकिय अधिकारी यांनी जखमी नामे तुळशिराम पठठे यास मयत घोषित केले. वरुन मयताचे नातेवाईक हजर नसल्याने सरकार तर्फे पोलीस फिर्यादी होवुन पोस्टे मलकापुर शहर येथे २७/०६/२०२५ रोजी अपराध क्र. ४०५/२०२५ कलम १०३ (१), ३(५) भारतीय न्याय संहिता प्रमाणे दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयामध्ये तपासाची तपास पथके स्थापन करून सदर गुन्हयामध्ये तात्काळ आरोपी निष्पन्न करून आरोपी नामे निलेश तुळशिराम पठठे, वय २४ व आरोपी नामे जया तुळशिराम पठठे, वय ४५ वर्ष यांना तात्काळ अटक करण्यात आली.

सदरची कारवाई. निलेश तांबे , पोलीस अधिक्षक, श्रेणीक लोढा, अपर पोलीस अधिक्षक, सुधिर पाटील उप विभागीय पोलीस अधिकारी यांये मार्गदर्शनाखाली गणेश गिरी, पोलीस निरीक्षक, सपोनि गजानन कौळासे, पोहेका शाम कपले, पोका आसिफ शेख, पोका सुरज चौधरी, पोका प्रविण गवई, पोका योगेश तायडे, पोका मनोज उमाळे, पोका संतोष कुमावत, पोका दिपक सोनोने यांनी केली आहे.

## गो. से. महाविद्यालयात सौर ऊर्जा जनजागृती मोहिम

**खामगाव (का.प्र.)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणारा करिअर कट्टा हा उपक्रम या उपक्रमांतर्गत करिअर कट्टा सोलार एनर्जी सोसायटी ऑफ इंडिया व विवा कॉलेज विरार यांचे संयुक्त विद्यमाने संपूर्ण महाराष्ट्रभर २१ व २२ जून रोजी सौरऊर्जा जनजागृती मोहीम राबविली गेली. सदर मोहिमेमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील गोसे महाविद्यालय खामगाव येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

## शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीकडे वळण्याची गरज : आ.डॉ. संजय कुटे

**जळगांव जामोद, (प्रतिनिधी)** - पारंपरिक पिकांच्या तुलनेत कमी पाणी लागणारे कमी देखभाल लागणारे आणि दीर्घकालीन उत्पन्न देणारे पीक म्हणून खजूर शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. आपल्या जळगाव जामोद मतदारसंघातील काही भागामध्ये जमीन ही खजूर लागवडीसाठी अत्यंत पोषक आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबतच आधुनिक शेतीकडे वळण्याची गरज आ.डॉ.संजय कुटे यांनी स्थानिक नगर पालिका सभागृहात खजूर उत्पादक शेतकरी कार्यशाळेत व्यक्त केले.

खजूर पिकाबाबत माहिती व्हावी याकरिता खजूर उत्पादक शेतकरी कार्यशाळेचे आयोजन २६ जुन रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेत खजूर लागवड करण्यास उत्सुक असलेल्या शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यशाळेमध्ये अप्पासाहेब शेंडगे, प्रकल्प विशेषज्ञ नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प जालना यांनी खजूर लागवडीबाबत सखोल माहिती दिली. विदर्भातील उष्ण व कोरडे हवामान खजूर लागवडीसाठी अत्यंत योग्य आहे. योग्य जातींची निवड, ठिबक सिंचनाचा वापर, जैविक खते आणि कीड नियंत्रणाची योग्य पद्धत वापरल्यास अल्प गुंतवणुकीतून दीर्घकाळ उत्पन्न मिळवता येऊ शकते. जगदीश शेंडगे, प्रगतशील शेतकरी



तणवाडी, जि. जालना यांनी जालना जिल्ह्यातील यशस्वी खजूर शेतीचा अनुभव शेअर केला.त्यांनी प्रतिवर्षी प्रती झाड शेकडो किलो उत्पादन मिळते असे नमूद करत शेतकऱ्यांनी या पिकाला व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहण्याचे आवाहन केले. यावेळी रमेश जाधव तालुका कृषी अधिकारी जळगाव जामोद आणि श्रीकृष्ण शिंदे उपकृषी अधिकारी जळगाव जामोद यांनी खजूर लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या सरकारी योजना, अनुदान आणि प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती दिली.

फळबाग लागवड योजना, पीएमएफएमई योजना आणि प्रक्रिया उद्योगासाठीच्या स्टार्टअप योजना शेतकऱ्यांसाठी मोठा फायदा देऊ शकतात. याशिवाय कृषी विभागामार्फत खजूर लागवडीसाठी दर्जेदार रोपे, तांत्रिक सहाय्य आणि प्रात्यक्षिके उपलब्ध करून दिली जात आहेत.

या कार्यशाळेमध्ये खजूर प्रक्रिया उद्योग, निर्यात संधी, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि मार्केटिंगचे विविध पैलू यावरही विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले. खजूरपासून साखर, सिरप, बर्फी आणि आरोग्यदायी स्नॅक्स तयार करता येतात. या सर्व प्रक्रियेच्या टप्प्यांवर आधारित लघुउद्योग ग्रामीण भागात उभारता येतील आणि त्यामुळे स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती होऊ शकेल. खजूर पिकाचे उत्पादन सुरू झाल्यानंतर झाडे ३० वर्षांपर्यंत फलधारणा करत असल्यामुळे एकदा लागवड केल्यावर शेतकऱ्यांना दीर्घकाळ उत्पन्न मिळण्याची खात्री असते.या उपक्रमामुळे जळगाव जामोद परिसरातील शेतकऱ्यांना नव्या शेती पर्यायाबद्दल मार्गदर्शन मिळाले असून भविष्यात खजूर लागवडीच्या माध्यमातून त्यांचे उत्पन्न वाढवणे, फळप्रक्रिया उद्योग सुरू करणे आणि शाश्वत शेतीचा मार्ग स्वीकारणे शक्य होईल.

कार्यशाळेअंती शेतकऱ्यांनी खजूर लागवड सुरू करण्यास उत्सुकता दर्शवली असून लवकरच प्रत्यक्ष लागवड क्षेत्र पाहणी, प्रशिक्षण शिबिरे आणि खजूर रोपे उपलब्ध करून देण्याचे नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात येणार आहे. या कार्यशाळेमुळे शेतकऱ्यांना शेतीतील बदल स्वीकारण्यासाठी नवी दिशा मिळाली असून खजूर लागवडीच्या माध्यमातून समृद्धीचे नवीन दार खुले होईल असा विश्वास व्यक्त केला.

# नगर परिषद जळगाव जामोद येथे आढावा बैठक संपन्न

**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** - जळगाव जामोद नगर परिषद कार्यालयात आज एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांचा आणि सुरू असलेल्या विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी, कर्मचारी, तसेच संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. शहरातील पाणीपुरवठा, वीज व्यवस्था, रस्ते व इतर मूलभूत सुविधा, तसेच स्वच्छता मोहिम याबाबत चर्चा केली तसेच शहरात निर्माणाधीन असलेल्या विकास कामांची तपशीलवार माहिती संबधित विभागाकडून घेतली.

### विकास कामांना गती देण्यावर भर



सध्या सुरू असलेल्या कामांची प्रगती तपासण्यात आली व उशीर होत असलेल्या कामांबाबत कारणे समजून घेत त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

वीज पुरवठा सुरळीत राहावा यासाठी महावितरणसोबत समन्वय साधण्यावर भर देण्यात आला.

काही भागांमध्ये वारंवार वीज खंडित होत असल्याचे निर्दर्शनास आणून देत यावर कायमस्वरूपी उपाय शोधण्याचे आदेश दिले आहेत. स्वच्छतेबाबत विशेष मोहिम राबवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. शहरातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठ या ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी नियमित साफसफाई करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

याशिवाय, शहरातील प्रमुख चौकांमध्ये नागरिकांना वाहतुकीमुळे व इतर कारणांनी होणारा त्रास टाळण्यासाठी आवश्यक उपाय योजना तात्काळ राबवाव्यात यावा साठी प्रयत्न करावे असे सांगिले या बैठकीद्वारे प्रशासनाला पुढील वाटचालीसाठी स्पष्ट दिशादर्शन मिळाले असून, शहराच्या विकास कामांना नवे गती मिळणार असल्याची अपेक्षा आहे.

## अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत क्रीडांगण विकासासाठी ७ लाखांचे अनुदान

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा मार्फत अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत सन २०२५-२६ करिता क्रीडांगण विकासासाठी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती वस्तीत असलेल्या शासकीय व अनुदानित शाळा, क्रीडा संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींना विविध कामांसाठी अधिकतम रुपये ७ लाख रुपये इतके अनुदान मंजूर करण्यात येणार आहे: ही कामे करता येतात : क्रीडांगण समपातळीत करणे, २०० मीटर/४०० मीटर धावपट्टी तयार करणे, कंपाऊंड भिंत/तार घालणे, प्रमाणित मैदान निर्मिती, प्रसाधनगृह, पिण्याचे पाणी व भांडारगृह उभारणी, फ्लडलाईट सुविधा, क्रीडा साहित्य खरेदी, प्रेक्षक गॅलरी व शेड बांधकाम, ड्रेनेज व स्प्रिंकलर यंत्रणा अटी व आवश्यक कागदपत्रे: अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या संस्थांची जमीन ही अनुसूचित जाती वस्तीत असणे अनिवार्य असून, स्तावासोबत गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र तसेच संस्थेच्या नावाने ७/१२ दस्तऐवज जोडणे आवश्यक आहे. या योजनेत प्राथम्यक्रमानुसार पात्र संस्थांमध्ये ग्रामपंचायत, नगरपरिषद, जिल्हा परिषद, सामाजिक न्याय विभागाच्या शाळा, आश्रमशाळा, वसतीगृह, क्रीडा विभागाचे संकुले, पोलीस कल्याण समिती, शासकीय महाविद्यालये व शिक्षण विभागाच्या अनुदानित संस्था यांचा समावेश आहे.

## बुलढाण्यात सामाजिक न्याय दिन उत्साहात साजरा

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त २६ जून हा दिवस दरवर्षीप्रमाणे यंदाही 'सामाजिक न्याय दिन' म्हणून बुलढाणा येथे उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा समाज कल्याण विभागाच्यावतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या दिवशी सकाळी ८ वाजता जिल्हा परिषद कार्यालय येथून समता दिंडी व जनजागृती रॅलीचे उद्घाटन जिल्हा समाज कल्याण अधिकारी डॉ. अनिता राठोड आणि जिल्हा जातप्रमाणपत्र पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी मनोज मेरत यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले. या रॅलीचे समारोप देखील जिल्हा परिषद कार्यालय येथे झाले. कार्यक्रमाच्या निमित्ताने नशामुक्ती विषयक चित्रप्रदर्शन स्टॉलचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, छत्रपती शाहू महाराज व इतर महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात व्यसनमुक्ती शपथवाचनाने झाली. प्रास्ताविक डॉ. अनिता राठोड यांनी करताना शाहू महाराजांच्या नावाने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली व सामाजिक न्याय दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. डी. आर. माळी यांनी शाहू महाराजांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व शेती क्षेत्रातील कार्य विशद केले. ''शाहू महाराजांचे शासन म्हणजे खरे लोककल्याणकारी राज्य होते. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांतूनच आपण आपल्या जीवनाची दिशा ठरवली पाहिजे,'' असे त्यांनी स्पष्ट केले. शाहीर डी. आर. इंगळे व ईश्वर मगर यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावरील समाजप्रबोधनपर गीत सादर केले. तसेच विश्वनाथ गोतरकर, सुरेश साबळे, समाधान इंगळे व निवृत्ती जाधव यांनी शाहू महाराजांच्या कार्यावर आधारित मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विविध योजनांचे लाभार्थी, समाजभूषण पुरस्कारप्राप्त मानकरी, समाजकार्य महाविद्यालयाचे कर्मचारी व विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला.

## आसलगाव त्रिमूर्ती कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशोत्सव साजरा

**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** - समता बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ जळगाव द्वारा संचालित त्रिमूर्ती कला वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय आसलगाव बाजार ता.जळगाव येथे विद्यार्थ्यांच्या जीवनातील आनंदाचा क्षण शाळेचा पहिला दिवस हा प्रवेशोत्सव दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी मिठाई व पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



विद्यार्थी जीवनामध्ये शाळेच्या पहिल्या दिवसाला खूप महत्त्वाचे स्थान असते. हा अविस्मरणीय क्षण त्रिमूर्ती कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांचा उत्साह वाढून शिक्षणात रुची निर्माण व्हावी यासाठी कनिष्ठ महाविद्यालया मध्ये विविध उपक्रम राबवल्या जातात. नियमित तासिका, वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धा , शैक्षणिक सहल, क्षत्रिय भेट, वनभोजन, आरोग्य शिबिरे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, राष्ट्रीय सेवा योजना च्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकासयासारख्या असंख्य उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढविण्यास भर दिला जातो.

या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात मोठ्या उत्साहात झाली असून विद्यार्थी आनंदी झाले आहेत. या प्रवेशोत्सवाच्या कार्यक्रमाला प्राचार्य कु. विद्या काटले, प्रा. सुप्रिया इंगळे, प्रा माहेश्वरी वाघमारे, प्रा.योगेश वारुकार,प्रा. रविंद्र निमकर्डे, यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित

महासागर
शनिवार दि. २८ जून २०२५
खामगाव
(बुलडाणा)
पान ६

# बुलढाण्यात ३०० हून अधिक बेकायदेशीर जन्म प्रमाणपत्राचे वाटप, किरीट सोमय्या यांचा खळबळजनक आरोप

## मलकापूर येथे तब्बल १४२६ बेकायदेशीर नोंदी



बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)– गतवर्षी मोठ्या प्रमाणात रोहिंग्यांनी खोटे कागदपत्र दाखल करून जन्मप्रमाणपत्र मिळवले होते. बुलढाणा जिल्ह्यात नायब तहसीलदाराने ३०० हून अधिक बेकायदेशीर प्रमाणपत्राचे आदेश दिले. ते सर्व आदेश रद्द करण्याचे निर्देश मंत्रालयाने दिले असताना आजपर्यंत एकही प्रमाणपत्र परत घेण्यात आले नाही, अशी माहिती भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी दिली. २६ जून रोजी ते बुलढाणा दौऱ्यावर आले असताना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांची त्यांनी भेट घेतली.

यासंदर्भात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याशी चर्चा केली आहे. बेकायदेशीर प्रमाणपत्रातील सर्व नावे रद्द करण्याची कारवाई सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. याव्यतिरीक्त काही ठिकाणी सरकारी दवाखान्यात एका वर्षाहून अधिक लोकांचे नाव बेकायदेशीरित्या जन्म नोंद करण्यात आल्या असून, मलकापूर येथे तब्बल १४२६ बेकायदेशीर नोंदी करण्यात आल्या असल्याचे सोमय्या म्हणाले.

याप्रकरणी सातत्याने पाठपुरावा करणार असून, सर्व बेकायदेशीर प्रमाणपत्र रद्द करण्याची कारवाई प्रशासकीय पातळीवर सुरू होणार आहे, असेही ते म्हणाले.

# खरीप हंगाम २०२५ पीक स्पर्धेत सहभागी व्हा आणि मिळवा ५० हजारांपर्यंतचे बक्षीस

बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)– राज्यातील व जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, तसेच उत्पादनक्षम शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२५ करिता पीक स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एम. डी. ढगे यांनी केले आहे. या योजनेचा उद्देश प्रयोगशील शेतकऱ्यांना सन्मानित करून त्यांच्या कार्यातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळवून देणे आहे. विजेत्या शेतकऱ्यांचे मनोबल वाढून आधुनिक शेतीकडे वळण्यास प्रोत्साहन मिळेल, यामुळे एकूणच जिल्ह्याचे व राज्याचे उत्पादन वाढण्यास हातभार लागेल. यामध्ये समाविष्ट असलेली पिके: मुग, उडीद, सोयाबीन, तूर, मका, बाजरी, ज्वारी, भुईमुग व सूर्यफूल. आवश्यक पात्रता: शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असावी व तो ती स्वतः कसत असावा,एकाचवेळी एकापेक्षा अधिक पिकांसाठी स्पर्धेत भाग घेता येतो,स्पर्धेसाठी निवडलेल्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्र लागवड असणे आवश्यक,सर्व प्राप्त अर्ज स्पर्धेस पात्र मानले जातील,राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावलेल्याला पुढील ५ वर्ष त्या पिकासाठी सहभाग घेता येणार नाही. मुग व उडीद: ३१ जुलै तर सोयाबीन, तूर, मका, बाजरी, ज्वारी, भुईमुग व सूर्यफूल: ३१ ऑगस्ट अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारीख आहे. यासाठी लागणारे प्रवेश शुल्क सर्वसाधारण गटासाठी ३०० रुपये प्रति पीक, आदिवासी गटासाठी १५० रुपये प्रति पीक असे शुल्क आकारण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी

# जागतिक नशामुक्ती दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## जळगाव पोलीस स्टेशनने राबविला उपक्रम



जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)– जागतिक स्तरावर, ''जागतिक नशा मुक्ती दिन'' ''आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिन'' २६ जून रोजी जळगाव जामोद पोलीस स्टेशनच्या वतीने नशा मुक्ती ची शपथ तसेच स्थानिक दि.न्यु.ईरा महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना पीएसआय राजकुमार कांबळे यांनी अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम आणि त्यापासून दूर राहिल्याने होणारे फायदे याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम तसेच निरोगी जीवनशैली कशी जगायची तसेच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवून समस्यांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित कशा पद्धतीने करावयाची याबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले.

दि. न्यु ईरा महाविद्यालयातील कार्यक्रमाला जळगाव जामोद पोलीस स्टेशनचे पीएसआय राजकुमार कांबळे, पीएसआय प्रशांत झेडगे, पोलीस कॉन्स्टेबल सचिन शेळके, महाविद्यालयाचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी उपस्थित होते. तसेच पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक श्रीकांत निचळ यांनी पोलीस स्टेशन ला कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांना नशा मुक्ती ची शपथ दिली यावेळी पीएसआय नारायण सरकटे, अमोल पंडित, एसआय विनोद गायकवाड, पो.हे.कॉं उमेश शेगोकार,ग यानसिंग राठोड, गजानन सातव, अतुल मोहाळे, कात्रे, पोलीस कॉन्स्टेबल मंगेश सोळंके, सागर तांदळे, मधुकर गाढे,अमोल नंदाने,झाल्टे, रणजीत भिसे, अयुब शेख, मधुकर गाढे यांचेसह डि.बी चे हेडकॉन्स्टेबल पवार उपस्थिती होते.

# बांधकाम चालू असलेल्या पुला जवळील रस्ता पुराने वाहून गेला

संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी) - तालुक्यातील बावनबीर गावाजवळील असलेल्या विद्यालयाजवळील नदीवर पुलाचे बांधकाम एक वर्षापासून सुरू असून मध्यंतरी अवकाळी पावसाने हा रस्ता वाहून गेल्याने बंद झाला होता. आणि आज दि. २६ रोजी सुद्धा ह्या नदीला पूर आल्याने हा रस्ता बंद झाला आहे ,त्यामुळे ये-जा करणाऱ्या दुचाकी, चारचाकी वाहने जात नाहीत. त्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याला दोषी कोण?

तालुक्यातील वरवट (बकाल )ते टुणकी मार्गे सोनाळा रस्ता असून मागील एक वर्षापासून शालेय विद्यालया जवळील जुना पूल खोदून नवीन पूलाचे बांधकाम करण्यात येत आहे, पर्यायी मार्ग म्हणून बाजूने कच्चा रस्ता तयार केला, परंतु नदीला पूर आला म्हणजे हा रस्ता बंद होणार! ह्या मार्गावरील एक वर्षापासून वाहनधारक त्रस्त झाले आहेत. वरवट( बकाल) येथून बावनबीर ,टुनकी मार्गे सोनाळा सातपुड्यातील आदिवासी भागात जाणाऱ्या वाहनधारक नागरिकांना ह्या त्रासामुळे



दुचाकी, चारचाकी वाहनाने जाण्या-येण्याचा कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित ठेकेदाराने ह्या कामाला मध्यंतरी काम बंद केले होते, अन पावसाळ्याच्या दिवसात पुन्हा कामाला सुरुवात केली मध्यंतरी अवकाळी पावसाने हा रस्ता बंद झाला होता, आणि भर पावसाळ्याचे दिवस असतांना काम सुरू केल्याने सदर दिला पूर आल्याने पुन्हा रस्ता बंद झाला आहे. यापूर्वी अनेक अपघात होवून एका शेळी, मेंढी पाळणाऱ्या व्यक्तीला जीव गमावावा लागला. त्यामुळे संबंधित ठेकेदाराबद्धल काम करणाऱ्या दृष्टीने संताप व रोष व्यक्त केल्या जात असून ह्या कामामुळे बांधकाम विभागाने लक्ष देवून सदर ठेकेदारावर नियमानुसार कारवाई करणे आवश्यक असल्याची नागरिकांमधून चर्चा होत आहे.


## जाहीर नोटीस

सर्वत्र जनतेस कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. नामदेव लक्ष्मण तायडे रा. नांदुरा ता.नांदुरा जि. बुलढाणा व गजानन लक्ष्मण तायडे रा. मालाड पुर्व मुंबई यांनी त्यांच्या सामाईक मालकीची व ताब्यातील मौजे टाका ता. नांदुरा जि. बुलडाणा येथील शेत गट नं. २१ एकुण क्षेत्रफळ ३ हे. २३ आर. यापैकी १ हे. २१ आर. शेत विलास करांगळे यांचे शेतजमिन यातील सर्व प्रकारच्या झाडाझुडासह याच्या पुर्वेस– विलास करांगळे यांचे शेत, पश्चिमेस – मोहन हिवराळे यांचे शेत, उत्तरेस– रमेश बोदडे यांचे शेत. दक्षिणेस– रेल्वे लाईन या चतुः सिमेच्या आंतील शेतजमिनीबाबत वि.व्यवहार न्यायाधिश कनिष्ठ स्तर न्यायालय नांदुरा येथे प्रल्हाद लक्ष्मण तायडे यांचे विरूध्द सरस निरस वाटणी होवुन शेत जमिनीचा ताबा मिळणे करीता दि.मु.नं. ४५/२०२५ नुसार दावा दाखल केलेला आहे.

वर वर्णन केलेल्या मालमत्तेबाबत कोणीही प्रल्हाद लक्ष्मण तायडे यांच्या सोबत कोणत्याही प्रकारचा बेकायदेशिर व्यवहार म्हणजे सदर शेत जमिन ठोक्याने, बटाईने देणे तसेच सदर शेत जमिनीवर कोणत्याही खाजगी व्यक्तीकडून कर्ज काढणे किंवा कर्ज दिल्यास किंवा कोणताही व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व जर कोणीही कोणताही व्यवहार केल्यास व्यवहार करणाऱ्या इसमाविरूध्द योग्य ती फौजदारी व दिवाणी स्वरूपाची कारबाई आमचे पक्षकार करतील व तेंव्हा त्या परिस्थितीत आमचे पक्षकाराच्या होणाऱ्या नुकसानीस सुध्दा व्यवहार करणारे इसम जबाबदार धरले जातील याची नोंद घेण्यात यावी.

ही जाहीर नोटीस
नांदुरा दि.

ॲड.पवन जी.परवाल
खडसे प्लॉटस, नांदुरा
मो.नं. ९४२२१८४२०५



## जाहीर नोटीस

सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदुरा, जि.बुलडाणा कोर्ट नं. २

एम.जे.सी.नं. १७०/२०२५
एफएफ ३०/०७/२५
अर्जदार करीता अधिवक्ता-ॲड.एस.एम. इंगळे
अर्जदार :- १. सुरेखा निळकंठ साबे
२. परमेश्वर निळकंठ साबे
नं. १ व २ रा. बेलाड ता. नांदुरा जि. बुलडाणा
३. शारदा मुकिंदा सपकाळ, रा. शेवगा बु. ता. संग्रामपुर जि. बुलडाणा ४.वृषाली दिपक काजळे, रा.वाकोडी ता. मलकापूर जि. बुलडाणा. विरुध्द- गैरअर्जदार - कोणी नाही
अर्ज- मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट (वारस हक्काचे प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ हयांचे वडील निळकंठ प्रल्हाद साबे बेलाड येथील रहिवाशी होते व ते दिनांक ०२.०२.२०२५ रोजी बेलाड येथेच मयत झाले आहेत. मयत निळकंठ प्रल्हाद साबे हयांना त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार हेच कायदेशिर वारस असल्याबाबतच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार हयांनी त्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी हया न्यायालयात अर्ज केला आहे. त्या अर्जाची सुनावणी तारीख ३०/७/२०२५ रोजी १०-३० वाजता होईल. तरी या जाहीर नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, सदर प्रकरणी ज्यांना काही हरकती, आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी वरील तारखेस किंवा सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासुन ३० दिवसाचे आत वि न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून त्यांचे आक्षेप, हरकती सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही आक्षेप, हरकत नाही असे समजुन अर्जदारांना वारस हक्क प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२३/६/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
दिनांक : दि.२३/६/२०२५

(शिक्का)

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
नांदुरा, जि.बुलडाणा



## जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर कोर्ट संग्रामपूर यांचे न्यायालय

एम. जे. सी.नं. ३२/२०२५
दा. ता. २३/०६/२०२५
अर्जदार तर्फे ॲड के.पि. बावस्कार, संग्रामपुर
अर्जदार - १) शेख नजीर शेख कदीर, वय अं. ५१ वर्षे, व्यवसाय शेती रा. बावनबीर ता. संग्रामपुर जि.बुलडाणा. २) शेख बशीर शेख कदीर, वय अं. ४६ वर्षे, व्यवसाय शेती रा. बावनबीर ता. संग्रामपुर जि.बुलडाणा.३) शेख खलील शेख कबीर (मयत) ३-अ) फरीदाबी शेख खलील, वय अं. ५६ वर्षे, व्यवसाय गृहिणी रा. बावनबीर ता. संग्रामपुर जि. बुलडाणा ३-ब) शेख अकील शेख खलील, वय अं. २९ वर्षे, व्यवसाय शेती रा. बावनबीर ता. संग्रामपुर जि. बुलडाणा ३-क) सलमाबी आमीन खान, वय अं. ३१ वर्षे, व्यवसाय गृहिणी रा. मलकापुर ता. मलकापुर जि. बुलडाणा ३-ड) रेशमाबी शेख जावेद, वय अं. २७ वर्षे, व्यवसाय गृहिणी रा. चांदुर बिस्वा ता. नांदुरा जि. बुलडाणा. ३-इ) शेख वकिल शेख खलील, वय अं. २४ वर्षे व्यवसाय शेती रा. बावनबीर ता. संग्रामपुर जि. बुलडाणा ३-ई) आयेशाबी शेख मुजम्मील, वय अं. २८ वर्षे, व्यवसाय गृहिणी रा. बावनबीर ता. संग्रामपुर जि. बुलडाणा

- विरूद्ध. गैरअर्जदार - कोणीही नाही.

या जाहीर नोटीसव्दारे सर्वत्रा लोकांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणातील मयत शेख कदिर शेख मोहीनोद्दीन हे मुळचे बावनबीर येथील रहिवासी होते व ते दिनांक ०७/०९/१९९० रोजी मौजे अकोला ता. जि. अकोला येथे मयत झाले असुन मयत शेख कदिर शेख मोहीनोद्दीन यांचे अर्जदार क्र. १ व २ हे मुले असुन अर्जदार क्र. ३-अ ही मयत मुलाची पत्नी म्हणजेच सुन असुन अर्जदार क्र. ३ ब व ३-५ ही मुले म्हणजेच नातु आहेत व अर्जदार क्र. ३-क, ३-ड व ३-ई ह्या विवाहीत मुली म्हणजेच नाती आहेत. मयत शेख कदिर शेख मोहीनोद्दीन हे मयत झाल्यानंतर त्यांच्या मागे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जदार यांनी दि. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी वरिल अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जा संबधात ज्या कोणास काही हरकत घेणे असेल, त्यांनी चौकशी तारीख ०५/०७ /२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. पावेतो या न्यायालयात अथवा स्वतः अथवा वकिलामार्फत हजर होऊन त्याची हरकत सादर करावी. अन्यथा कुणाची काहीही हरकत नाही असे समजुन वारस प्रमाणपत्रा देणेबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस सहिनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी आज दिनांक २३/०६/२०२५ रोजी दिली.

(शिक्का)

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कोर्ट
संग्रामपूर जि.बुलडाणा



क्रमांक /कावी/ अका कुळ/५८३/२०२५
तहसिलदार नांदुरा यांचे कार्यालय
दिनांक: ०२/०६/२०२५

## जाहीर नामा

याद्वारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार छगन किसन कांडेलकर रा. पिंप्री कोळी ता. नांदुरा येथील गट नं. ६० एकुण क्षेत्र ६ हे. ६८ आर. आकार ४०.०० या पैकी ०.८१ हे आर शेत अर्जदार यांनी वसंत काशिनाथ मोरे रा. सा. नेहु यांचे कडुन दिनांक ११/१/१९९० रोजी रजि.खरेदी दस्तााद्वारे घेतली असुन तेव्हापासुन सदर गटातील ०.८१ हे आर शेत जमीन अर्जदार हयांचे मालकी हक्काने ताब्यात व वहीतीत आहे.

परंतु अर्जदार यांनी सदर जमीनीचे ९/३,९/४ ची नक्कल काढली असता त्यामध्ये मुंबई कुळ कायदा १९५८ मधील ८(१)व २ अन्वये सुरजमल खेतसींगदास मारवाडी याने सन १९५८-५९ साली स.न. २५ सालीम वहीत केल्यामुळे त्यास सामान्य कुळाचा हक्क प्राप्त झाला आहे अशी नोंद दिसुन येत आहे. तसेच सदर जमीनीचे संगणीकृत सातबारा उताराचे इतर अधिकार रकान्यामध्ये कलम ८ (१) व ८ (२) अन्वये मुंबई कुळ कायदा सन १९५८ मधील वहीत केल्यामुळे त्यास सामान्य कुळाचा सन ५८-५९ साली गट नं.६० मधील मारवाडी याचे हक्क प्राप्त झाला आहे अशी संदीग्ध व मोघम नोंद आढळुन येते. प्रत्यक्षात अर्जदार यांचा सदर नोटीशी काही एक संबध नाही तसेच संगणीकृत सातबारा उतारामधील नोंद ही अपुर्ण,मोघम असुन त्यापासुन कोणताही बोध होत नाही. वर नमुद गट नंबर ६० मधील ०.८१ आर जमीन अर्जदार यांनी खरेदी करुन घेतली असून अंदाजे ३४ वर्षापेक्षा जास्त काळापासुन अर्जदार यांचे प्रत्यक्ष मालकी हक्काने ताब्यात व वहीतीत आहे. त्याबाबत आजपर्यंत कोणीही, कोणत्याही प्रकारची हरकत उपस्थित केली नाही. अर्जदार यांना जमिनीबाबत हस्तांतरणाचा दस्त पंजीबध्द करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे सदर जमीनीचे सातबारामधील इतर अधिकार रकान्यातील असलेली कुळाची नोंद कमी करण्यासाठी त्या अर्ज या कार्यालयाकडे सादर केला आहे.

सदर शेत जमीन मुंबई कुळ वहिवाट कायदा (विदर्भ क्षे.) चे कलम ४३ सह वाचनिय कलम ४७ नुसार इतर अधिकारातील कुळाची नोंद कमी करणे संदर्भात कोणासही काही हरकत/आक्षेप असल्यास त्यांनी लेखी हरकत आक्षेप दिनांक २१/०६/२०२५ पर्यंत तहसिल कार्यालय नांदुरा येथे दाखल करावी. उक्त तारखेनंतर आलेल्या हरकतीचा विचार केल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तहसीलदार, नांदुरा



## दि.नांदुरा अर्बन को–ऑप बँक लि.,नांदुरा

मुख्य शाखाः 'कल्पतरू', स्टेशन रोड, नांदुरा ४४३४०४ जि.बुलडाणा

## ताबा सुचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी रोखीकरण व वित्तीय मालमत्तेची पुर्नरचना आणि प्रतिभुती हितसंबंधाची अंमलबजावणी कायदा २००२ चे कलम १३ (१२) अन्वये आणि प्रतिभुती हितसंबंध (अंमलबजावणी) नियम २००२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील सही करणाऱ्या दि नांदुरा अर्बन को ऑप बँक लि., नांदुरा प्राधिकृत अधिकारी यांनी खालील थकीत कर्जदारांना, जमानतदारांना व कर्जासाठी गहाण देणाऱ्यांना उक्त कायद्याचे कलम १३ (२) अन्वये मागणी नोटीस पाठवुन त्यामध्ये नमुद केलेली कर्ज रक्कम ६० दिवसाच्या आत परतफेड करण्यासाठी फर्मावीले होते. रकमेची परतफेड करण्यास कर्जदार नोटीस मिळवुन सुध्दा निष्फळ ठरले असुन याव्दारे कर्जदारांना व सर्वसाधारण जनतेस असे सुचित करण्यात येते की खालील सही करणाऱ्याने, उक्त कायद्याचे कलम १३(४) तसेच उक्त नियमांच्या नियम ९ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मालमत्तेचा सांकेतीक ताबा घेतलेला आहे. सदर मालमत्ते संदर्भात कोणतेही व्यवहार दि नांदुरा अर्बन को ऑप बँक लि. नांदुरा शाखा नांदुराच्या प्रभारास अधिन असेल.

| अ. क्र | कर्जदाराचे नाव | १३ (२) नोटीस दिनांक | पंचनामा दिनांक | शिल्लक बाकी | मालमत्ता धारक | मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १.मोहन ट्रेडर्स प्रो.प्रा.महेश केशवलाल हरगुणानी, पाण्याच्या टाकी जवळ, नांदुरा ता.नांदुरा जि.बुलडाणा.<br>२. रेखा मानीकलाल उदासी (जमानतदार ) सिंधी कॉलनी, आठवडी बाजार, नांदुरा ता. नांदुरा जि.बुलडाणा.<br>३. मोहनलाल केशवलाल हरगुणानी (जमानतदार), संकल्प कॉलनी, नांदुरा ता. नांदुरा जि. बुलडाणा. | २८/०३/२५ | २१/०६/२५ | रू. २००६६३०५/- + दि.०१/०६/२५ पासुन पुढील व्याज व वसुली खर्च | महेश केशवलाल हरगुणानी | मौजे नांदुरा बु. प्रभाग क्र.०६, मालमत्ता क्रमांक ५८४ आणि ५८५ नझुल शिट कमांक १२, प्लॉट क्रमांक २६/१+२, क्षेत्रफळ ६३५१.८० चौ.मी प्लॉट क्रमांक २७ क्षेत्रफळ ५८०१ चौ. मीटर पैकी २११.७७ चौ.मी.<br>चतुः सिमा - पूर्व- रस्ता पश्चिम- रस्ता, उत्तर- रस्ता दक्षिण - महेश हरगुणानी जागा |
| २. | १. महेश केशवलाल हरगुणानी(कर्जदार) मिहाणी चौक,नांदुरा, ता. नांदुरा, जि.बुलडाणा.<br>२. मानीकलाल माधवदास उदासी (जमानतदार) नांदुरा ता. नांदुरा जि.बुलडाणा.<br>३. प्रकाश केशवलाल हरगुणानी (जमानतदार) प्रकाश इलेक्टॉनिक्स, मेन रोड, नांदुरा ता. नांदुरा जि.बुलडाणा.<br>४. मोहनलाल केशवलाल हरगुणानी ( जमानतदार) संकल्प कॉलनी, वार्ड नं ०४, नांदुरा ता नांदुरा | २८/०३/२५ | २१/०६/२५ | रू. ५४९९७८८/- + दि.०१/०६/२५ पासुन पुढील व्याज व वसुली खर्च | महेश केशवलाल हरगुणानी | मौजे नांदुरा बु. नांदुरा नगरपालिका क्षेत्रात प्रभाग क्रमांक ०३. वार्ड क्र. ०६ मालमत्ता क्रमांक ६२७/१ नझुलशिट नं १२, प्लॉट नं २६/२, २६/१ एकुण क्षेत्र ६३५१.८० चौ.मी आणि प्लॉट नं २७ क्षेत्र ५८०१ चौ. मी. ताबा आणि मालकी हिस्सा क्षेत्रफळ २८४.२७ चौ. मी बांधकाम आणि भविष्यात बांधण्यात येणाऱ्या बांधकामासह.<br>चतुःसिमा - पुर्व-३० फुट रस्ता पश्चिम- १२ फुट रस्ता. उत्तर- कर्जदार इतर जमिन दक्षिण- भगवंतराव देशमुख जमिन |

- प्राधिकृत अधिकारी ( दि.नांदुरा अर्बन को ऑप बँक लि., नांदुरा)


RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव(बुलढाणा)
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलडाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

